# महाराष्ट्र राज्य पोलीस बिनतारी संदेश विभाग
# प्रसिध्दीपत्रक माहे मार्च - २०२१

**क्र. क - ५ / प्रसिद्धीपत्रक / ०३ / २०२१** **दिनांकः- २८/ ०४ / २०२१**

**१. नेमणूक / सेवासमाप्ती :- निरंक**

**2. पदोन्नती / पदावनती :-**

या कार्यालयाचे आस्थापनेवरील प्रमुख आचारी या पदावर सेवाज्येष्ठतेनुसार सहायक आचारी श्रीमती वर्षा वसंत लोखंडे, नेमणुक बि.सं. प्रशिक्षण केंद्र, पुणे यांना पदोन्नती समितीने पात्र ठरविलेने त्यांना सदर आदेशाचे दिनांकापासुन प्रमुख आचारी पदावर ( वेतनश्रेणी एस-५ : रु. १८०००-५६९००/- ) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

श्रीमती वर्षा वसंत लोखंडे यांची प्रमुख आचारी या पदावर बि.सं. प्रशिक्षण केंद्र, पुणे येथे नेमणुक राहील.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे कार्या. आदेश क्र.आस्था -१/ई-२/प्रमुख आचारी पदोन्नती /९४८ अ /२०२१, दि.०९/०३/२०२१ )**

**३. सेवानिवृत्ती / स्वेच्छासेवानिवृत्ती :- निरंक**

**४. बदली :- निरंक**

**५. बक्षिस :**

**१. कामगिरीचा तपशील :-** पोलीस उप-अधिक्षक बिनतारी संदेश पुणे येथील खालील नमुद अमंलदार यांनी जानेवारी २०२१ व फेब्रुवारी २०२१ या कालावधीत कामकाज उत्कृष्टरित्या पुर्ण केलेले आहे. त्यांच्या कौशल्यपुर्ण कामगिरीबाबत व भविष्यातही त्यांनी यापेक्षा चांगले प्रकारे कामगिरी करावी म्हणुन सदर कामगिरीबद्दल खालील अमंलदार यांना प्रोत्साहनपर बक्षिस मंजुर करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | पदनाम | नांव | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | पोहवा/सुतारमार | श्री.राहुल आनंतदराव हरिभक्त | संशोधन व विकास बि.सं. पुणे | रु.१०००/- व GST |
| ०२ | पोहवा/ वीजतंत्री | श्री. संतोष नारायण अनपट | संशोधन व विकास बि.सं. पुणे | रु.१०००/- व GST |
| ०३ | पोहवा/ वीजतंत्री | श्री.ज्ञानेश्वर काशिनाथ त्रिभुवन | संशोधन व विकास बि.सं. पुणे | रु.१०००/- व GST |
| ०४ | पोहवा/ सुतारमार | श्री.राहुल आनंतदराव हरिभक्त | संशोधन व विकास बि.सं. पुणे णे | रु.१०००/- व GST |
| ०५ | पोहवा/ वीजतंत्री | श्री.सुनिल प्रताप ठाकुर | संशोधन व विकास बि.सं. पुणे | रु.१०००/- व GST |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे कार्या. आदेश क्र.ई-७ / बक्षीस /२०२१/१७८५, दि.२२/०३/२०२१ )**

**२. कामगिरीचा तपशील :-** मा. पोलीस आयुक्त पुणे शहर येथेल नमुद अमंलदार यांनी जानेवारी २०२१ व फेब्रुवारी २०२१ या कालावधीत कामकाज उत्कृष्टरित्या पुर्ण केलेले आहे. त्यांच्या कौशल्यपुर्ण कामगिरीबाबत व

भविष्यातही त्यांनी यापेक्षा चांगले प्रकारे कामगिरी करावी म्हणुन सदर कामगिरीबद्दल खालील अमंलदार यांना प्रोत्साहनपर बक्षीस मंजुर करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | पदनाम | नांव | नेमणूकीचे ठिकाण | बक्षीस रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | पो.शि.क्र.२४७८ मुख्या.पुणे शहर | श्री.ज्ञानेश्वर भागवत चोरमले | पो.शि.क्र.२४७८ मुख्या. पुणे शहर | रु.१०००/- व GST |

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे कार्या. आदेश क्र.ई-७ / बक्षीस /२०२१/१७९४, दि.२३/०३/२०२१ )**

**६. शिक्षा :-**

**१) सक्त ताकीद शिक्षेबाबत .:-** मपोहवा बियंचा / सविता वैभव महारनोर, नेमणुक - मध्यवर्ती तपासणी कार्यालय, पुणे खालीलप्रमाणे कसुरी केली आहे.

पुणे -२ टर्मिनल येथे मनुष्यबळ कमी असल्याने पोलीस निरीक्षक बि.सं. मध्यवर्ती तपासणी कार्यालय, पुणे यांनी तुमची दि. १.१.२०२१ पासून टर्मिनल स्थानक प्रतिनियुक्ती कर्तव्य दिले होते. परंतू तुम्ही सदरचे कर्तव्य टाळण्याच्या उद्देशाने जाणीवपूर्वक दि. २.१.२०२१ पासून ते १७.१.२०२१ पर्यंत १६ दिवस रुग्णनिवेदन केलेले आहे.

एकंदर तुम्ही वरिष्ठांनी दिलेले आदेशाचे पालन करता जाणीवपुर्वक रुग्णनिवेदन करुन तुमचे कायदेशीर कर्तव्यामध्ये बेशिस्त व बेजबाबदारपणा केला असल्याचे दिसुन आले आहे. यास्तव सदर कसुरीबद्दल तुम्हास महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ मधील तरतुदीनुसार **''सक्त ताकीद ''** ही शिक्षा देण्यात येत आहे. सदर शिक्षेविरुध्द अपील अनुज्ञेय नाही. भविष्यात वरिष्ठांचे आदेशाचे योग्यप्रकारे पालन करण्याची व दिलेले कर्तव्य जबाबदारी पार पाडण्याची दक्षता घ्यावी.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ई-२/विचौ-२१०५/पोहवा बियंचा-महारनोर/शिक्षा/९०८/२०२१, दि.० ८/०३/२०२१)**

**२) चापोना / गणेश बबन** जगदाळे नेमणुक - मो.प.वि. पो.बि.सं.म. राज्य पुणे येथे कार्यरत असताना पोलीस उप - अधिक्षक बि.सं. प्रशासन, यांनी तुमची मा. पोलीस उप-महानिरीक्षक, बि.सं. यांचे शासकीय वाहनावर कर्तव्यावर नेमणुक केली होती. परंतू तुम्ही सदर कर्तव्यावर न जाता दि. २३.१२.२०२० पासुन ०६ दिवस किरकोळ रजा मिळणेबाबत मागणी केली. तथापि तुमचे रजा खाती किरकोळ रजा शिल्लक नसल्याने रितसर अन्य रजेचा अर्ज देण्याबाबत पोलीस निरीक्षक बि.सं. गृह यांनी तुम्हास कळविले असता, तुम्ही अन्य रजेचा अर्ज सादर न करता व कोणास काहीही न सांगता दि. २३.१२.२०२० पासून कर्तव्यावर विनापरवाना गैरहजर राहीलेले आहात. तद्नंतर तुम्ही दि. ३१.१२.२०२० रोजी कर्तव्यावर हजर झाले असून दि. २३.१२.२०२० ते ३०.१२.२०२० पर्यंत ०८ दिवस आजारपण कालावधी अर्जित रजा मंजुर होणेस विनंती केली असून अर्जासोबत वैद्यकीय अधिकारी शिवाजीनगर पोलीस दवाखाना, पुणे यांचेकील दि. ३०.१२.२०२० रोजीचा केस पेपर क्र. १५००२ व त्यांची प्रतिस्वाक्षरी असलेले डॉ.संपत पुंगलिया यांचे वैद्यकीय प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडली आहे.

तुम्ही, अर्जासोबत सादर केलेल्या उपरोक्त कागदपत्रांवरुन तुमची दि. २३.१२.२०२० पसुन प्रकृती ठिक असताना तुम्ही दि. ३०.१२.२०२० रोजी शिवाजीनगर पोलीस दवाखाना येथे विलंबाने केस पेपर काढलेला आहे. यावरुन दिलेले कर्तव्य टाळण्याचे उद्देशाने तुम्ही जाणीवपुर्वक दि. २३.१२.२०२० ते ३०.१२.२०२० पर्यंत ०८ दिवस कर्तव्यावर विनापरवाना गैरहजर राहीलेले आहात. तसेच तुम्ही रितसर सिक पासची मागणी केलेली नसुन कर्तव्यास येणार नसलेबाबत कार्यालयास कोणत्याही प्रकारे कळविलेली नाही. अशाप्रकारे तुम्ही तुमचे कायदेशीर कर्तव्यामध्ये उपरोक्तप्रमाणे बेशिस्त निष्काळजीपणा व बेजाबाबदारपणे गैरवर्तन केल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सदर कसुरीबद्दल ०५ दिवसांचे आत खुलासा सादर करणेबाबत तुम्हास संदर्भ क्र ०२ अन्वये ज्ञाप देण्यात आला होता. परंतू त्यास एक महिन्याचा कालावधी होऊनही तुम्ही अद्याप खुलासा सादर केला नसुन याबाबत तुम्हास काहीही सांगायचे नाही असे गृहीत धरुन तुम्हास पुढीलप्रमाणे शिक्षा देणयात येत आहे.

आदेश :-

मी स्मार्तना पाटील, पोलीस अधिक्षक बि.सं.(मुख्यालय) म.राज्य, पुणे मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम २५ व २६ आणि महाराष्ट्र पोलीस ( शिक्षा व अपिले) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन **चापोना/ गणेश बबन जगदाळे , नेमणुक मो.प.वि. पोलीस बिनतारी संदेश , म.राज्य पुणे तुम्हास उपरोक्त कसुरीबद्दल ' सक्त ताकीद'' ही शिक्षा देण्यात येत आहे**. सदर शिक्षेविरुध्द अपील अनुज्ञेय नाही.

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ई-२/२१०२/विचौ/चापोना-जगदाळे /शिक्षा /९९१/२०२१ दि.१२/०३/२०२१**

३) **विषयः-गैरहजर कालावधी / अकार्यदिन (Dies-non) म्हणुन नियमित केलेबाबत**

**श्रीमती पुजा दिपक महाजन , माजी पोहवा बियंचा तत्का, नेम. ठाणे शहर**

श्रीमती पुजा दिपक महाजन, माजी पोहवा / बियंचा तत्कालीन नेमणुक- बिनतारी संदेश विभाग, ठाणे शहर ह्या दि. ०१/०६/२०१८ ते २५/११/२०२० पर्यंत एकूण ९०९ दिवस कर्तव्यावर गैरहजर होत्या, त्यांची सदरची अनुपस्थिती समर्थनीय नसल्याने प्रस्तृत प्रकरणी त्यांचे विरुध्द करण्यात आलेली शिस्तभंगाची / विभागीय चौकशी कारवाई पुर्ण करण्यात आली असुन संदर्भ क्र, १ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

तरी, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ नियम क्रमांक ६३(३) बाबत नियुक्ती प्राधिकारी यांना शासन निर्णय क्र. सेनिवे १००१/१३०/सेवा -४ दि. ०२/०६/२००३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार, श्रीमती पुजा दिपक महाजन , माजी पोहवा/ बियंचा तत्का नेमणुक बि.सं.वि. ठाणे शहर यांचा **दि. ०१/०६/२०१८ ते २५/११/२०२० पर्यंत एकूण ९०९ दिवस कर्तव्यावरील गैरहजर कालावधी 'अकार्यदिन (Dies-non) म्हणुन नियमित करण्यात येत आहे. त्यांचा नमुद गैरहजर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनार्थ (निवृत्तीवेतनविषयक लाभांसह) ग्राह्य धरण्यात येऊ नये.**

**(अपोमसं व संचालक पोबिसं यांचे आदेश क्र.आस्था-१/ई-२/विचौ -२०२१/महाजन/गैरहजर कालावधी /१८७९/२०२१, दि. ३०/०३/२०२१**

७. निधन :- निरंक

८. संकीर्ण :- निरंक

दिनांक : २८ /०४/२०२१

( श्रीमती स्मार्तना पाटील )
पोलीस अधीक्षक, बि.सं. (मुख्या),
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश, म.रा.पुणे, कार्यालय



3 | Page